महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र. - ४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र:-
Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-संकिर्ण-४७२१/प्र.क्र.१७/एसएम-२ दिनांक:- ३० सप्टेंबर, २०२१

प्रति,

**विभागीय शिक्षण उपसंचालक,** *तथा*
**अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,**
**पुणे विभाग, पुणे.**

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा /दर्जावाढ करण्यास प्रस्ताव सादर करणेबाबत...
**इंडस इंटरनॅशनल स्कूल पुणे प्रा.लि, पुणे संचलित इंडस इंटरनॅशनल स्कूल (पुणे) प्रा.लि, भुकुम, ता.मुळशी, जि.पुणे**

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२, दि. १९.०१.२०१३
२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२०, दि. ०५.१०.२०२०

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० दिनांक ०५.१०.२०२० रोजी अधिसूचित करण्यात आले आहेत. सदर नियमाअन्वये नवीन शाळा मान्यता तथा विद्यमान शाळेची दर्जावाढ करण्याकरीता अर्ज करण्याची कार्यपध्दती, इरादा पत्र देण्याची कार्यपध्दती तसेच मान्यता पत्राकरीता अर्ज करण्याची व मान्यता पत्र देण्याची कार्यपध्दती विहित केलेली आहे. त्याचप्रमाणे, स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर अर्ज स्वीकारण्यासाठी आणि त्यांची छाननी करण्यासाठी राज्यस्तरीय प्राधिकारी आणि क्षेत्रस्तरीय प्राधिकारी यांची नियुक्ती, त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि कामकाज चालविण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती यांबाबतही नियमांमध्ये तरतुद करण्यात आली आहे.

२. उपरोक्त स्वयं अर्थसहाय्यित नियमातील नियम क्र. १५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन खालील नमुद संस्थेचा/संस्थांचा स्वयंअर्थसहाय्यित नवीन शाळा/दर्जावाढीचा ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात आला/आले असून सदर अर्ज सोबत जोडून पाठविण्यात येत आहे/आहेत :-

INDUS INTERNATIONAL SCHOOL
PUNE

| अ. क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | मंडळ | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | इंडस इंटरनॅशनल स्कूल पुणे प्रा.लि, पुणे | इंडस इंटरनॅशनल स्कूल (पुणे) प्रा.लि, भुकुम, ता.मुळशी, जि.पुणे | इंग्रजी | आय.बी. | दर्जावाढ शाळा माध्यमिक ते उच्च माध्यमिक शाळेला जोडून प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इ. १ ली ते ७ वी) |

३. तरी सदर प्रकरणी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मध्ये विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करून, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० मधील नियम ३ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.

(प्रदिप पडोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक व उच्च माध्यमिक), जि.प.पुणे

INDUS INTERNATIONAL SCHOOL PUNE